वर्ष - 7 । अंक - 140 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM) रणधुमाळी

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 25 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आरसी बुक ची प्रतिक्षा संपणार!

## » इतर कंपनी सोबत स्मार्ट कार्ड देण्याचा करार

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**स्मार्ट कार्डच्या पुरवठ्याबाबत राज्याच्या परिहवन विभागाचा हैदराबाद येथील एका कंपनीशी असलेला करार संपुष्टात आला आहे. आता नव्याने कर्नाटक येथील कंपनीला स्मार्टकार्डचे कंत्राट देण्यात आले आहे. त्यानुसार परिवहन विभागाला रोज 45 हजार स्मार्ट कार्ड मिळणार आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना आरसी बुक मिळण्याच्या कामाला गती मिळण्याची शक्यता आहे.**



आरटीओ'कडे नवीन लायसन्स काढण्यासह जुन्या लायसन्सवरील विविध सेवांसाठी हजारो नागरिकांकडून अर्ज केले जातात. मात्र यासाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्डचा गेल्या काही महिन्यांपासून तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना वेळेवर लायसन्स व आरसी मिळत नाहीत. लायसन्ससाठीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना साधारण 15 ते 20 दिवसांमध्ये ते मिळणे अपेक्षित आहे. मात्र नागरिकांना 25 ते 30 दिवस झाले तरी आरसी व लायसन्स मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. तर, काही जणांस तर एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी लायसन्स व आरसी मिळालेले नाही. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. आरटीओच्या या कारभारावर नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

### परवान्यांच्या कामाला देखील सुरुवात होणार

**» स्मार्ट कार्डअभावी पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना आरसी बुक पासून वंचित रहावे लागत होते. 54 हजारांहून अधिक नागरिकांचे वाहन परवाने आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) प्रलंबित आहेत. तर 12 हजाराहून अधिक वाहन नोंदणी प्रमाणपत्रांचे काम पूर्ण झाले असून, काही दिवसांत परवान्यांच्या कामाला देखील सुरुवात होणार आहे. प्रत्येक दिवसाला 45 हजार स्मार्ट कार्ड बनविली जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे आरसी प्रतिक्षा थांबून आता त्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता आहे.**

# अधिकाऱ्यांनी दर्जेदार काम करावे!

## » उपमुख्यमंत्री अजित पवार : निगडी, शरदनगर आणि दुर्गानगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला भेट

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर घालणारे काम अधिकाऱ्यांनी करावे अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. निगडी, शरदनगर आणि दुर्गानगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या 670 झोपडीधारक सभासदांच्या पुनर्वसन प्रकल्पाला रविवारी (दि.24) भेट दिली. प्रकल्पाची माहिती घेत त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली.**

यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनय चौबे, सुनील नहार आदी उपस्थित होते. वेळी पवार यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात दोन झोपडी धारकांना सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी सदनिकातील सुविधा, सौर ऊर्जेची व्यवस्था, इमारतीची सुरक्षा, देखभाल आणि स्वच्छता, परिसरातील वृक्षारोपण, जलपुनर्भरण आदीविषयी माहिती घेतली. इमारतीच्या परिसरात स्वच्छता राखावी, प्रकल्पातील विविध सेवांसाठी स्थानिकांना संधी द्यावी अशा सूचना त्यांनी केल्या.



### मेट्रो सुविधा निगडीपर्यंत आणण्यासाठी प्रयत्नशील

**» इमारतीत चांगल्या सुविधा देण्यात आल्या असून त्या नीटपणे वापराव्यात. घरासोबत इमारतही स्वच्छ व सुंदर राहील असा सर्वांनी प्रयत्न करावा, असे त्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. मेट्रो सुविधा निगडीपर्यंत आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.**

# महिला आरक्षण विधेयकाचा भाजपा महिला मोर्चा कडून आनंदोत्सव!

**। पिंपरी ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचे ऐतिहासिक विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्याचा आनंदोत्सव पिंपरी-चिंचवड शहर भाजपाने साजरा केला. पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मिठाई भरवत, फुगडी खेळून महिलांनी जल्लोष साजरा केला.

भाजपाच्या महिला शहराध्यक्षा सुजाता पालांडे, आमदार उमा खापरे, माजी नगरसेविका उषा मुंडे, शर्मिला बाबर, अनुराधा गोरखे, निर्मला कुटे, आरती चोंधे, सरचिटणीस शैला मोळक, महिला सरचिटणीस वैशाली खाडे, चिटणीस राजश्री



जायभाय, गीता महेंद्रू, मधुकर बच्चे आदीसह महिला पदाधिकारी या वेळी उपस्थित होत्या.

आमदार उमा खापरे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गणेशचतुर्थीच्या दिवशी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गेल्या कित्येक वर्षात झाले नव्हते असे 33 टक्के आरक्षण महिलांना दिले. लोकसभा, विधानसभेत महिलांची संख्या वाढणार आहे. मागच्या सरकारने खूपवेळा आरक्षण देणार असे सांगितले. पण दिले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र अधिवेशन घेवून महिलांना आरक्षण दिले. गौरीची भेट महिलांना दिली.

# तुरुंगात कैद्याचा मनीऑर्डर घोटाळा!

## अधिकाऱ्यांच्या हुबेहूब सह्या करून कैद्याने लाटले 26 लाख

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**येरवडा मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या सचिन रघुनाथ फुलसुंदर या कैद्याने तुरुंग अधिकाऱ्यांच्या हुबेहूब बनावट सह्या आणि मनीऑर्डर रजिस्टरमध्ये खोटे दिनांक, हिशेब लिहीत 26 लाख 69 हजार रुपये हडपल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.**

सचिन फुलसुंदर हा कैदी सन २००६ मधील बलात्कार व खुनाचा प्रयत्न गुन्ह्यातील आरोपी असून फेब्रुवारी 2021 ते ऑगस्ट 2023 यादरम्यान त्याने कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांची नजर चुकवून कारखाना विभागात होणाऱ्या वस्तू बाहेर पाठवण्याच्या मदतीचा बहाणा केला. या विभागात वारंवार येऊन त्याने तेथील अधिकारी व कर्मचारी यांचा विश्वास संपादन केला. येरवडा कारागृह येथील कैद्यांना त्यांच्या नातेवाइकांनी केलेल्या मनीऑर्डरची नोंद ठेवल्या जाणाऱ्या २ ए रजिस्टरमध्ये क्रमांक एक ते सहामध्ये त्याने फेरफार केला. कारागृह अधिकाऱ्यांच्या हुबेहूब खोट्या सह्या, दिनांक, खोटे हिशेब तयार करून किरकोळ रकमा स्वत:चे व इतर कैद्यांचे नावे दाखवल्या आणि सदर रक्कम परस्पर वापरून एकूण अंदाजे २६ लाख ६९ हजार ९११ रुपयांचा अपहार केला. सचिन फुलसुंदर हा १४ वर्षापासून कारागृहात बंदीस्त असल्याने तो कामानिमित्त मेनगेटवर येत असल्याने मेनगेटमधील कर्मचारी त्यास अडवत नसे. या संधीचा फायदा घेऊन व कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करुन शिक्षाबंदी फुलसुदंर हा न्याय विभागात येऊन संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांच्या ताब्यात असलेले २ ए रजिस्टर हाताळत असे. कर्मचाऱ्यांची नजर चुकवून अधिकारी ज्याप्रमाणे बंदी यांच्या नातेवाईकांनी पाठविलेल्या मनिऑर्डरच्या रजिस्ट्रमध्ये नोंदी घेतात, त्याप्रमाणे तो हुबेहुब खोटी दिनांक, खोटी स्वाक्षरी व खोटी रक्कम नोंद करत असे तसेच खोटे हिशोब तयार करायचा. अनेक वेळा तो सर्कल क्रमांक-१०३ येथे २ ए रजिस्टर घेऊन जाऊन तेथे खोटी दिनांक, खोटी स्वाक्षरी, व रक्कमा नोंद करुन परत रजिस्टर न्यायविभागात आणून ठेवत होता. सचिन रघुनाथ फुलसुदंर हा नारायणगांव पोलीस स्टेशन येथील बलात्कार गुन्ह्यातील आरोपी आहे. तो सन २००६ पासून कारागृहात दाखल असून त्यास काम वाटप कमिटीने कारखाना विभाग येथे साफसफाईचे काम दिले होते. त्यानुसार शिक्षाबंदी फुलसुदंर हा साफसफाईचे काम करत असताना शिक्षा बंदींचे खाजगी रक्कमेचे २ ए रजिस्टर मध्ये खोटया मनिऑर्डर फेरफार करत असल्याचे गोपनीय माहिती कारागृह प्रशासनास मिळाली होती. याबाबत येरवडा कारागृह तुरुंगाधिकरी बापुराव भिमराव मोटे यांनी सचिन फुलसुंदर विरोधात पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणानंतर येरवडा कारागृह प्रशासन खडबडून जागे झाले आहे. यापुढे मनीऑर्डरची सगळी हस्तलिखित कामे बंद करून 'ई-प्रिझन' सॉफ्टवेअरच्या साहाय्याने कामे करण्याचे आदेश पोलिस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी दिले आहेत. त्यामुळे यापुढील कारागृहातील सर्व मनीऑर्डरची कामे ऑनलाइन स्वरूपात होणार आहे. ई-प्रिझनच्या माध्यमातून यापुढे मनीऑर्डरचे सर्व व्यवहार करण्यात येतील. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार रोखले जातील, असे मत येरवडा कारागृह अधीक्षक सुनील ढमाळ यांनी व्यक्त केले आहे.




### कैद्यावर नजर ठेऊन गुन्हा उघड

» सचिन रघुनाथ फुलसुदंर हा नारायणगांव पोलीस स्टेशन येथील बलात्कार गुन्ह्यातील आरोपी आहे. तो सन २००६ पासून कारागृहात दाखल असून त्यास काम वाटप कमिटीने कारखाना विभाग येथे साफसफाईचे काम दिले होते. त्यानुसार शिक्षाबंदी फुलसुदंर हा साफसफाईचे काम करत असताना शिक्षा बंदींचे खाजगी रक्कमेचे २ ए रजिस्टर मध्ये खोटया मनिऑर्डर फेरफार करत असल्याचे गोपनीय माहिती कारागृह प्रशासनास मिळाली होती. याबाबत येरवडा कारागृह तुरुंगाधिकरी बापुराव भिमराव मोटे यांनी सचिन फुलसुंदर विरोधात पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे.

# पर्यावरण पूरक विसर्जन व मूर्तीदानाला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद!

## "माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या पुढाकाराने कृत्रिम हौदाची सुविधा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक मधील नागपुर चाळ येथे गणेश विसर्जनासाठी कृत्रिम हौदाची सुविधा देण्यात आली आहे. माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या पुढाकाराने सुरू केलेल्या या उपक्रमाला प्रभागातील नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, या उद्देशाने दरवर्षी ही सुविधा दिली जाते. यामुळे नागरिकांची विसर्जनाची गैरसोय देखील टळत असून गणेश भक्तांना जवळच विसर्जनाची सुविधा मिळत आहे.**

पर्यावरण पूरक गणेशोत्सव, पर्यावरण पूरक गणपती विसर्जन आणि मूर्तीदानाबाबत शासकीय स्तरावरून सातत्याने आवाहन केले जात आहे. प्रशासनाच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी आपल्या प्रभागात दरवर्षी कृत्रिम हौदाची सुविधा गणेश भक्तांसाठी सुरू केली आहे. गेल्या वर्षांपासून हा उपक्रम आयोजित केला जात आहे. प्रभाग क्रमांक दोन मधील महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, लुंबिनी उद्यान व येरवडा पोस्ट कार्यालयाजवळ ही सुविधा दिली आहे. या उपक्रमाला प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी सुमारे दीड हजार गणेश मुर्तींचे संकलन देखील होत आहे. पुणे महापालिकेच्या अधिकार्‍यांकडे गणेश मुर्ती देऊन विसर्जनाची व्यवस्था केली जात आहे.



“ महापालिका प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत गेल्या सात वर्षांपासून प्रभागात कृत्रिम हौदाची सुविधा देत आहे. गणेश भक्तांकडूनही त्याला उत्स्फू र्त प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी सुमारे दीड हजार गणेश मुर्तींचे संकलन होत आहे. त्या आम्ही महापालिका प्रशासनाकडे विसर्जनासाठी देत आहे.

–डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी उपमहापौर, पुणे महापालिका.

### अधिकाऱ्यांकडून व्यवस्थेची पाहणी

» महापालिका प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन डॉ. धेंडे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाला अधिकार्‍यांकडून देखील सहकार्य मिळत आहे. यंदाच्या वर्षी या उपक्रमाला उपायुक्त किशोरी शिंदे, सहाय्यक आयुक्त करचे, नागटीळक, आरोग्य निरीक्षक स्वप्निल कुताळ यांच्यासह महापालिका कर्मचार्‍यांनी पाहणी केली. लुंबिनी उद्यान गणपती विसर्जन हौद व येरवडा पोस्ट कार्यालय आदी ठिकाणी पाहणी करत त्रुटी व अर्धवट राहिलेली कामे पूर्ण करून घेण्याच्या सूचना दिल्या.

# समाविष्ट गावांतील वीज ग्राहकांना 'बाप्पा पावले'!

## महावितरणच्या आकुर्डी व भोसरी विभागाचे होणार विभाजन

- राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हिरवा कंदिल
- भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश
- तीन नवीन शाखा कार्यालय, अतिरिक्त मनुष्यबळाचा मार्ग मोकळा




भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांसह औद्योगिक पट्टयातील वीज समस्या आता निकालात निघाली आहे. महावितरण प्रशासनाकडून आकुर्डी व भोसरी उपविभागाचे विभागाजन भोसी-१ आणि भोसरी-२ असे करण्यात येणार आहे. तसेच, तीन नवीन शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार आहे. या प्रस्तावाला राज्याचे ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे भोसरी मतदार संघातील वीज समस्या सोडवण्यासाठी वीज ग्राहकांना ऐन गणेशोत्स्वात " गणपती बाप्पा पावला" आहे.

महावितरण संदर्भातील प्रस्तावित वीज विषयक कामांसाठी व निधी मिळणेबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी वारंवार पाठपुरावा केला होता. जुलै-२०२३ मध्ये मुंबई येथे झालेल्या विधानसभा अधिवेशनामध्ये लांडगे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला आता यश मिळाले आहे.

महावितरणच्या भोसरी विभागांतर्गत औद्योगिक व घरगुती असे सुमारे ३ लाख ७० हजार वीजग्राहक आहेत. एका शाखा कार्यालयांतर्गत १६ तांत्रिक कर्मचारी सुमारे ४० ते ६० हजार ग्राहकांना सेवा अखंडित वीज सेवा देण्यासाठी कार्यरत असतात. ग्राहक संख्या जास्त असल्यामुळे वीजसमस्या आणि तांत्रिक अडचणींच्या तक्रारी वाढल्या आहेत. भौगोलिक कार्यक्षेत्र आणि वीज मागणी याचा विचार करता भोसरी गाव व आकुर्डी विभागाचा काही भाग असे विभाजन करुन नव्या उपविभागाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, स्पाईन सिटी, इंद्रायणीनगर आणि चिखली शाखा कार्यालयांची स्थापना करण्यात येणार आहे. यामुळे ग्राहकांना सेवा देण्यासाठी महावितरण कंपनीत अतिरिरक्त कर्मचारी वर्ग मिळेल. मोशी आणि संभाजीनगर शाखा कार्यालय अंतर्गत अंदाजे दीड लाख ग्राहकांना सेवा देण्यासाठी केवळ ३२ कर्मचारी होते. नवीन शाखा कार्यालयाच्या निर्मितीमुळे ती संख्या ४८ पर्यंत जाणार आहे. त्यामुळे ग्राहक सेवा सुधारणा आहे. चिखली गाव परिसरात सुमारे २९ हजार वीज ग्राहक आहेत. नवीन शाखा कार्यालयामुळे या ठिकाणी अतिरिक्त १६ कर्मचारी उपलब्ध होणार आहेत. याचप्रमाणे स्पाईन सिअी आणि इंद्रायणीननग एमआयडीसी शाखा कार्यालयासाठी अतिरिकत मनुष्यबळ मिळणार आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, समाविष्ट गावांतील वीज समस्या सोडवण्यासाठी वीज उपकेंद्र उभारण्याचा निर्णय घेतल्यामुळे वर्षभरात हे इन्फ्रास्ट्रक्चर निर्मिती होईल. त्यामुळे नवीन विकसित भागातील वीज पुरवठा सक्षम होईल. यासोबतच सध्या या भागातील वीज पुरवठ्याचा अतिरिकत भार गावठाण भागांवर होत आहे. तो कमी होणार असल्यामुळे गावठाण आणि समाविष्ट भाग असे दोन्ही परिसरात वीज पुरवठा सुरळीत आणि सक्षम होणार आहे. कारण, पायाभूत सुविधांसह आता अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, आगामी ५० वर्षांतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून वीज विषयक पायाभूत सुविधा निर्मिती करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. त्याला यश मिळत असल्याचे समाधान आहे.

> "भोसरी विधानसभा मतदार संघात औद्योगिकरण आणि नागरीकरण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. त्यामुळे प्रशासन आणि वीज वितरण व्यवस्थेवर ताण येत आहे. याबाबत २०१४ पासून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात इन्फ्रा-१ आणि इन्फ्रा- २ ची कामांसाठी पाठपुरावा केला होता. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात वीज विषयक कामे पुन्हा लांबणीवर पडली. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात या प्रश्नाबाबत सरकारचे लक्ष वेधले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडचा उल्लेख "फ्युचर मेगासिटी" असा करीत सभागृहात वीज समस्या सोडवण्याबाबत पायाभूत सुविधा सक्षम करण्याची घोषणा केली होती. त्याला आता मूर्त स्वरुप आले आहे. प्रशासनाने तात्काळ या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबवावी आणि आगामी वर्षभरात काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा. पिंपरी-चिंचवड..


---

# शिक्षकांच्या अर्जित रजेच्या मागणीचा मार्ग मोकळा

## महापालिका शिक्षण विभागाच्या मुख्याध्यापकांना सूचना

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक शिक्षकांच्या अर्जित रजेची मागणी मान्य करण्यात आली आहे. मात्र अनेक अटी शर्ती घालून देण्यात आल्या आहेत. गेल्या अडीच वर्षापासून शिक्षकांची ही मागणी प्रलंबित होती. त्याला शिक्षण विभागाकडून हिरवा कंदील दाखविण्यात आला आहे.**



महापालिका शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना पूर्णवेतनी परावर्तित रजा (वैद्यकीय रजा) लागू आहेत. याविषयीचा प्रस्ताव 2022 पासून महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे होता. गेल्या अडीच वर्षापासून प्राथमिक शिक्षकांना अर्जित रजेचा प्रश्न प्रलंबित होता. तो लागू केला आहे. त्यासाठी काही अटी व शर्ती लागू केल्या आहेत. यामध्ये प्रत्येक कॅलेंडर वर्षात 10 दिवसानंतर अनुज्ञेय राहील. म्हणजेच जानेवारी ते जुलै अखेर 5 दिवस व ऑगस्ट ते डिसेंबर अखेर 5 असे एकूण 10 दिवसांचा समावेश आहे. अर्जित रजा मंजूर करून घेतल्यास वैद्यकीय रजा घेता येणार नाहीत. संबंधित कर्मचाऱ्याची नियुक्ती किंवा सेवासमाप्ती अर्ध्या वर्षाच्या मध्येच झाली असेल तर त्या वर्षामध्ये तो जेवढी पूर्ण कॅलेंडर महिने सेवा करणार आहे. संबंधित कर्मचाऱ्याच्या अर्जित रजेच्या खाती 2 अनार्जित रजेसाठी 1 अर्जित रजा याप्रमाणे टाकण्यात यावी. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम मधील तरतुदीनुसार अर्जित रजा रोखीकरण (प्रत्यार्पित) करण्याची मुभा दिली जाणार नाही. पूर्व परवानगी शिवाय रजा घेता येणार नाहीत. अर्जित रजा घेण्यासाठी किमान 7 दिवस आधी मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या शिफारशीसह अर्ज कार्यालयास सादर करणे. वेळेत मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या शिफारशी शिवाय अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यास रजा मंजूर होण्यास विलंब लागल्यास संबंधित अर्जदार त्यासाठी जबाबदार राहतील, आदी अटी व शर्ती घालून देण्यात आल्या आहेत.

वैद्यकीय रजेचे अर्जित रजेत रूपांतरित करून घेण्याबाबत कार्यालयास संबंधितांनी अर्ज करावा. याप्रमाणे अर्जित रजेबाबत अटी असून त्याप्रमाणे संबंधितांना कार्यवाही करून अर्ज कार्यालयास पाठवावेत. तरी मुख्याध्यापकांनी या परिपत्रक सर्वांच्या निदर्शनास आणून देऊन यावर सर्व शिक्षकाची स्वाक्षरी घ्यावी, अशा सूचना सहायक आयुक्त विजय थोरात यांनी केल्या आहेत.

# पिंपरी चिंचवडमध्ये रोहित पवारांचा झंझावात

## शहरातील गणेश मंडळांच्या गाठीभेटी

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राष्ट्रवादी काँग्रेसने तुषार कामठे या तरुण चेहऱ्याला शहराध्यक्ष पदाची संधी दिली आणि हा तरुण पायाला भिंगरी लावून पक्ष वाढीसाठी पळत आहे. दरम्यान गणेशोत्सवाचे औचित्य साधून आमदार रोहित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरातील गणेश मंडळाना भेटी गाठीचा दौरा केला. गणपती मंडळाच्या दर्शनासाठी रोहितदादा पवार चक्क दुचाकीवर स्वार झाले आणि पावसाची तमा न बाळगता गर्दीच्या गांधी पेठ आणि लिंक रोडवरच्या मंडळाना भेटी दिल्या.

या भेटीगाठी पहाटे ३ वाजेपर्यंत सुरु होत्या. यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वच्छेने ढोल ताशा न वाजवता फुलांच्या पायघड्या घालून रोहित पवार यांचे स्वागत केले. मंडळाना भेट देणार म्हणून अनेक मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने जागे होते. रोहित पवार यांनी पिंपरी येथील सुखवानी गृहनिर्माण संस्था तसेच पुनावळे येथील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या भेटी घेउन नियोजित कचरा डेपो बाबतीत चर्चा केली. शहरभर फिरताना सर्व मंडळाना पहाटे ३ वाजेपर्यंत भेटी दिल्या. या सर्वात महिलावर्ग सुद्धा मागे नव्हता.

रोहित पवार यांचा चाहता वर्ग या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहराने पाहिला. शहराला एक नवीन युथ आयकॉन आणि नवीन आपला दादा मिळाल्याची भावना युवकांमध्ये दिसत होती. यावेळी रोहित पवार यांनी शहरातील जेष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. येत्या काळात रोहित पवार, तुषार कामठे आणि प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वरपे हे युवा आणि जेष्ठ यांची सांगड घालून नवीन बदलच्या दिशेने पाऊल टाकत आहेत अशी चर्चा शहरभर होत आहे. यावेळी रोहित पवार यांनी अनेक गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत सेल्फी काढली. कुणी मॅगी बनवली होती ती खाल्ली, कुणी मसाला दूध दिले त्यांचा त्यांनी हसत स्वीकार केला.



## भूमिका

**लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना आरक्षण दिले जावे, ही कल्पना सगळ्यात पहिल्यांदा मांडली गेली तेव्हापासून म्हणजे गेली ३० वर्षे हे आरक्षण मिळण्यासाठी स्त्रियांनी वाट बघितली आहे. त्यांना त्यासाठी आणखी तिष्ठत ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी जनगणना आणि मतदारसंघांची पुनर्रचना यासारख्या अडथळ्यांची खरे म्हणजे काहीच गरज नव्हती.**

# निवडणुकीसाठी भाजपचा नवा 'जुमला'!



भारताच्या घटनात्मक आणि संसदीय इतिहासातील पुढील तीन तारखा महत्त्वाच्या आहेत. १२ सप्टेंबर १९९६: पंतप्रधान देवेगौडा यांच्या सरकारने संसदेत ८१ वी दुरुस्ती सुचवणारे विधेयक सादर केले. या विधेयकात लोकसभा आणि राज्य विधानसभेतील एकतृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली होती. त्याचे पुढे काहीच झाले नाही. ९ मार्च २०१०: पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारने राज्यसभेत १०८ वी घटनादुरुस्ती करणारे विधेयक मांडले. ते १९९६ च्या विधेयकासारखेच होते आणि १८६:१ मतांनी मंजूर झाले. हे विधेयक लोकसभेत पाठवण्यात आले पण तिथे ते प्रलंबित राहिले. १५ वी लोकसभा विसर्जित झाल्याने हे विधेयक रद्द झाले. १८ सप्टेंबर २०२३: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने लोकसभेत १२८ वी घटनादुरुस्ती सुचवणारे विधेयक सादर केले. त्यातील महिला आरक्षणविषयक तरतुदी, लोकसभा आणि राज्य विधानसभेतील एकतृतीयांश जागा या गोष्टी आधीच्या विधेयकांप्रमाणेच आहेत, परंतु त्यात तीन पूर्वसूचना आहेत. एकदा हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आणि राष्ट्रपतींनी मंजूर केले की, नवीन कलम ३३४ अ अन्वये, "१२८ व्या घटना दुरुस्तीचा कायदा लागू झाल्यानंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेतून जी आकडेवारी मिळेल, त्यातून मतदारसंघाची पुनर्रचना केली जाईल." २०२१ मध्ये जनगणना होणार होती; तिला एव्हाना खूपच उशीर झाला आहे. जनगणना हा एक मोठा, व्यापक कार्यक्रम असतो. आणि त्यातून हाती काय लागले ते समजायला पुढे दोन वर्षे लागतात. सध्या तरी पुढील जनगणनेची तारीख अनिश्चित आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ८२ मधील तिसऱ्या तरतुदीनुसार प्रत्येक राज्यातील लोकसभेसाठीच्या जागांचे पुनर्वाटप २०२६ पर्यंत रोखून ठेवण्यात आले होते. 'एक व्यक्ती, एक मत' या नियमानुसार दक्षिणेतील तसेच आणि पश्चिमेकडील राज्यांच्या जागा कमी होतील आणि उत्तरेकडील राज्यांच्या वाढतील. जागा गमावण्याची शक्यता असलेल्या राज्यांचे म्हणणे आहे की त्यांच्या राज्यांमध्ये शिक्षणाची स्थिती चांगली आहे, आरोग्यसेवा उत्तम आहे आणि त्यांनी कुटुंबांचा आकार मर्यादित ठेवण्याचे फायदे लोकांच्या मनावर चांगल्या पद्धतीने बिबवले आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रित ठेवण्यात यशस्वी झाले आहेत. पण याच गोष्टीची त्यांना शिक्षा दिली जात आहे. २०२६ नंतर घेण्यात येणाऱ्या जनगणनेचा अहवाल आल्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना सुरू करता येऊ शकते. पण या प्रक्रियेत राजकीय अडथळेही येऊ शकतात. पुन्हा वाटप केल्यानंतर, नवीन मतदारसंघ पुनर्रचना कायद्यांतर्गत सीमांकन सुरू होईल. या आधीची मतदारसंघ पुनर्चना २००२ मध्ये सुरू झाली होती आणि सहा वर्षांनी १९ फेब्रुवारी २००८ रोजी ती पूर्ण झाली होती. त्यामुळे २०२६ नंतरची पहिली जनगणना होईल; तिची आकडेवारी प्रसिद्ध केली जाईल; मग लोकसभेतील जागांचे पुनर्वाटप होईल; नवीन सीमांकन कायदा लागू होईल; त्यानंतर मतदारसंघांचे सीमांकन होईल आणि शेवटी आरक्षण लागू होईल. यातली प्रत्येक पायरी कधी पूर्ण केली जाईल ते आज अनिश्चित आहे. महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी या अनिश्चित घटनांवर अवलंबून आहे. त्यामुळे २०२९ ची त्याची वेळ आणखी पुढे जाईल अशी भीती वाटते. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मार्गात आकृतिबंधामुळे किंवा अज्ञानातून मोदी सरकारने जे अडथळे आणले आहेत त्याकडे हे सरकार दुर्लक्ष करू शकत नाहीत. १९९६ आणि २०१० च्या विधेयकांमध्ये हे अडथळे नव्हते. हे अडथळे जाणीवपूर्वक आणल्याचा आरोप महिलांनी सरकारवर केला तर ते चुकीचे ठरणार नाही. १९ सप्टेंबर २०२३ रोजी तीन वेगवेगळय़ा वेळा यासंदर्भात केलेल्या भाष्यात, पंतप्रधानांनी त्यांचे सरकार या अडथळय़ांवर मात करण्यासाठी काय करणार आहे, हे स्पष्ट केलेले नाही. अशा पद्धतीचे सरकारचे मौन ही खरे सांगायचे तर फारशी चांगली गोष्ट नाही. मोदी सरकारला ही जबाबदारी पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या सरकारकडे टोलवत राहायची आहे हे स्पष्ट आहे.

## संपादकीय »

# ठोस धोरण हवे!

***पावसाने यंदा दिलेल्या ओढीचा परिणाम अनेक क्षेत्रांप्रमाणेच साखर उद्योगावरही पडणार, हे स्वाभाविकच होते.***

एका बाजूला शेतकऱ्यांचे हित राखायचे तर दुसऱ्या बाजूला कारखान्यांचा पायाही मजबूत ठेवायचा, या दोन्ही बाबी साध्य करण्यासाठी सरकारला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळेच उसाची परराज्यात होणाऱ्या विक्रीवर आधी घातलेली बंदी अवघ्या काही दिवसांत मागे घ्यावी लागली आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखाने, इथेनॉलसारखे उपपदार्थ निर्मिती करणारे प्रकल्प... या साऱ्यांचा विचार करून ठोस धोरण ठरवावे लागणार असून, तसे केल्यासच या कठीण काळात साखर उद्योग टिकून राहू शकणार आहे.

अल निनोमुळे यंदा पाऊसमान कमी राहणार असल्याचा तज्ज्ञांचा अंदाज खरा ठरला आहे. मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रातील पिकांना जेव्हा गरज होती, तेव्हाच पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पश्चिम महाराष्ट्र हा साखरेचा पट्टा म्हणून ओळखला जात असल्याने, साहजिकच ऊस उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो आहे.

**भारतीय परिवर्तन वादाला, क्रांती -प्रतिक्रांतीचा वैचारिक इतिहास आहे. बळीराजाच्या मूल्यवर्धित नि अधिकार संपन्न समाज व्यवस्थेपासून ते मनुस्मृतीची पेरणी, रुजवणी, आणि उगवणीपर्यंतचा इतिहास हा प्रतिक्रांतीचा इतिहास आहे. ती बहुजनांच्या जय-पराजयाची लढाई आहे. बळीराजाच्या परिवर्तनवादी क्रांतीवर वैदिकांनी प्रतिक्रांती केली तर वैदिकांच्या प्रतिक्रांतीवर बुद्धांच्या परिवर्तनवादी तत्त्वज्ञानाने क्रांती केली.**

# सत्यशोधक समाजाचा दीडशे वर्षांचा लखलखीत वारसा



बहुजन हिताय-बहुजन सुखाय ही बुद्धाची परिवर्तनवादी क्रांती, बदलत्या सामाजिक स्थित्यंतरामध्ये आपण नीट पेलू शकलो नाही. परिणामी मनुस्मृतीने प्रतिक्रांती केली. आजही मनूस्मृतीची मुळे सामाजिक संस्कृतीत खोलवर रुजलेली दिसतात. तर काही मुळे उघडपणे आणि काही अतिसूक्ष्मपणे आजही भारतीय समाजाला पोखरुन टाकत आहेत हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. या पारंपारिक सनातन प्रवृत्तीचा विचार करता, क्रांतीपिता महात्मा फुलेंनी भारतीय समाजाला समग्र क्रांतीची परिभाषा प्रदान करणारी, भारतीय समाजाला व्यापक परिवर्तनाची दिशा देणारी क्रांती २४ सप्टेंबर १८७३ साली, सत्यशोधक समाजाची स्थापना करून केली. "सत्यशोधक समाज" ही पारंपारिक देव-धर्म व्यवस्थेला धक्का देणारी देशातील पहिली सामाजिक संस्था होय. ती समाज जीवनाच्या चिंतनावर काथ्याकूट करणारी संस्था नव्हती, शूद्र -अति शुद्राच्या प्रश्नांवर फक्त चिंता व्यक्त करणारीही नव्हती, तर परिवर्तनाच्या मैदानात उतरून बहुजनांच्या चिंतेवर प्रत्यक्ष कृती करणारी संस्था होती. त्यापूर्वी महात्मा फुले यांनी १८५३ साली "सत्त्याचा शोध" आणि १८५४ मध्ये "मनुस्मृतीचा धिक्कार" या पुस्तिकांच्या माध्यमातून देशात प्रथमतः सत्यशोधकी विचारसरणी मांडली. महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज समजून घेताना लक्षात येते की धार्मिकतेचा उन्माद असणारी मनुस्मृती हा वैदिकांचा धर्मग्रंथ होय. १८५४ च्या कालखंडात मनुस्मृतीच्या विरोधात बोलण्या, लिहिण्यासाठी लागणारे धाडस हे शूरांचे, वीरांचे नि क्रांतिकारकांचेच होते. म्हणून त्या तत्कालीन सामाजिक परिस्थितीतील वैचारिक संघर्षाबरोबरच सामाजिक संघर्षही अभ्यासणे आवश्यक वाटते. कुठल्याही समाजहितार्थ आणि समाज परिवर्तनसाठी निर्माण झालेल्या सामाजिक संस्थेचे ध्येय हे शोषणमुक्त समाज, भयमुक्त समाज, अधिकारसंपन्न समाज आणि मूल्यांचे चिंतन नि जतन करणाऱ्या समाजाच्या निर्माणीची ती नांदी असते. या अन्वयार्थाने समजून घेणे गरजेचे आहे. सत्यशोधक समाजाच्या निर्मितीचे मूळ आणि कूळ हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेच्या विचार – व्यवहारात सापडते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारतीय समाज कालही देव-धर्म -पंथ, दैव, जात-वर्गीय आणि कर्मकांडाचा गुलाम होता आणि आजही आहे. म्हणूनच, "सीपॉयाज रिव्होल्ट"चे लेखक हेन्री मिड यांच्या ग्रंथाच्या मराठी प्रस्तावनेत महात्मा फुले म्हणतात... या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून आज शेकडो वर्ष शुद्रादि-अतिशूद्र सतत दुःखे सोसत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अदानी-पवार भेटीत गैर काय?

## » पवारांच्या भूमिकेवर कुणीही संशय घेऊ नये : जयंत पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्योगपती गौतम अदानी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्या भेटीमुळे पुन्हा एकदा शरद पवारांच्या भूमिकेवर तर्कवितर्क सुरू झाले आहेत. मात्र, शरद पवार आणि गौतम अदानी यांच्या भेटीत गैर काय?, असा सवाल राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे.**

अदानी-पवार भेटीवर पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर जयंत पाटील यांनी भाष्य केले. जयंत पाटील म्हणाले, उद्योगपती गौतम अदानी यांनी नवा उद्योग सुरू केला आहे. त्यांच्या उद्घाटनाला शरद पवार गेले यात गैर काय आहे. तो प्रकल्प काही आपल्या राज्यातून गेलेला नाही. त्यांना नवा प्रकल्प साहेबांना दाखवायचा असेल. पवारसाहेब इंडिया आघाडीमध्ये सध्या आहेत. त्यात काही शंका घेऊ नये. तसेच, शरद पवार आणि प्रफुल्ल पटेल यांचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यावरही जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संसदेचे अधिवेशन असताना अनेक खासदार एकत्र



भेटतात. फोटो काढण्याचा मोह त्यांना आवरला नसेल म्हणून काढला असेल, असे जयंत पाटील म्हणाले. दरम्यान, अजित पवार यांच्या बंडानंतर बारामती लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. इथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. यावर येत्या निवडणुकीत बारामतीतून कुणाला उमेदवारी दिली जाणार? महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असणार? या पत्रकारांच्या प्रश्नावर जयंत पाटील म्हणाले, मी माझ्या पक्षाच्या उमेदवाराबाबत सांगू शकतो. कोण कुणाला तिकिट देईल हे माहिती नाही. पण राष्ट्रवादीकडून सुप्रिया सुळेच 2024 ची निवडणूक लढवतील. आम्ही तिन्ही पक्ष एकत्र येऊन कुठून कोण लढेल हे ठरवू. भावी मुख्यमंत्री म्हणत राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांचे बॅनर लागले आहेत. यावर जयंत पाटील म्हणाले, लोकशाहीत पोस्टर कुणीही लावू शकते. समर्थक कुणाला कुठेही नेऊन बसवतात. पवारसाहेबांकडे जे नेते आहेत, त्यांच्यापैकी अनेकांमध्ये मुख्यमंत्रीपदाची क्षमता आहे. त्यामुळे अनेकांचे फ्लेक्स लागतात.

### बारामतीमधून सुप्रिया सुळेच

» दरम्यान, अजित पवार यांच्या बंडानंतर बारामती लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. इथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. यावर येत्या निवडणुकीत बारामतीतून कुणाला उमेदवारी दिली जाणार? महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असणार? या पत्रकारांच्या प्रश्नावर जयंत पाटील म्हणाले, मी माझ्या पक्षाच्या उमेदवाराबाबत सांगू शकतो. कोण कुणाला तिकिट देईल हे माहिती नाही. पण राष्ट्रवादीकडून सुप्रिया सुळेच 2024 ची निवडणूक लढवतील. आम्ही तिन्ही पक्ष एकत्र येऊन कुठून कोण लढेल हे ठरवू.

# राज्यात लवकरच ऑलिम्पिक भवन

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी राज्य शासन काम करीत असून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडण्यासाठी पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची कार्यवाही गतिमान करण्यात आली आहे. या विद्यापीठाच्या कुलगुरूपदी क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती नेमण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथेही क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत 656 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. राज्यात खेळाडूंच्या मदतीसाठी ऑलिम्पिक भवन स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली, ते उदगीर येथे बोलत होते.

राज्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, यासाठी राज्य शासनाचा क्रीडा विभाग प्रयत्नशील आहे. यासाठी खेळाडू केंद्रबिंदू मानून विविध उपक्रम, योजना राबविण्यात येत असल्याची माहिती संजय बनसोडे यांनी दिली. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यातील अनेक खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करून लौकिक वाढवीत आहेत. सध्या चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही राज्यातील 60 पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत. यापुढेही राज्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

राज्याच्या क्रीडा विभागामार्फत लक्षवेध योजनेंतर्गत विविध 12 क्रीडा प्रकारांच्या विकासावर भर देण्यात येणार आहे. 'खेलो इंडिया'अंतर्गत राज्यामध्ये जास्तीत जास्त क्रीडा अकादमी स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून यासाठी केंद्रीय क्रीडा मंत्री यांच्याकडे पाठपुरावा सुरु असल्याचे बनसोडे यांनी सांगितले. तसेच पारंपारिक आदिवासी खेळांचा समावेशी क्रीडा प्रकारात करण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याची त्यांनी यावेळी नमूद केले.

# कुसुमाग्रजांची कविता मंत्रालयात!

## » मी स्वत:ला राजकारणी म्हणवत नाही : राज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कुसुमाग्रजांची कविता राजकीय लोकांना समजली नाही. एकदा कुसुमाग्रजांची एक कविता मंत्रालयात लावली होती. जागा चुकली होती, अशी मिश्किल टिप्पणी करत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जोरदार फटकेबाजी केली.डॉ. नागेश कांबळे यांनी कवी कुसुमाग्रज यांचे अप्रकाशित साहित्य संकलित केले आहे.**

या अप्रकाशित साहित्याचे क आणि ख या दोन ग्रंथाचे प्रकाशन राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. ठाण्यात हा कार्यक्रम होता. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी साहित्य, कविता तसेच सध्याची राजकीय स्थिती यावर जोरदार टोलेबाजी केली. राज ठाकरे म्हणाले, कुसुमाग्रजांची कविता राजकीय लोकांना समजली नाही. ती कविता निदान जनतेला तरी समजली पाहिजे. कवी कुसुमाग्रज यांची 'पन्नाशीची उमर गाठली' ही कविता मला अत्यंत आवडते. ही कविता प्रत्येकाच्या घरात लावली पाहिजे आणि जो चुकत असेल त्याला ती पाठवली पाहिजे. ही कविता मंत्रालयात लावली होती. जागा चुकली होती. राज ठाकरे म्हणाले, कवी कुसुमाग्रज यांना मी बाळासाहेबांबरोबर भेटलो होतो. ती एकच त्यांना भेटण्याची संधी मिळाली होती. आपण आपल्याच लोकांना मोठे करत नाही. आपली माणसे किती थोर होती हे परदेशात सांगितले जाते पण दुर्दैवाने ते आपल्याकडे सांगितले जात नाही. ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी आपल्या भाषणात आपल्याकडे अज्ञानाचे महामेरु खूप आहेत असा उल्लेख केला होता. त्याचे समर्थन करत राज ठाकरे म्हणाले, हल्लीच्या मंत्र्यांना तर काही माहीतच नसते. ते वर्तमानकाळात नसतातच. सध्याच्या राजकीय



### पन्नाशीची उमर गाठली

» राज ठाकरे म्हणाले, कुसुमाग्रजांची कविता राजकीय लोकांना समजली नाही. ती कविता निदान जनतेला तरी समजली पाहिजे. कवी कुसुमाग्रज यांची 'पन्नाशीची उमर गाठली' ही कविता मला अत्यंत आवडते. ही कविता प्रत्येकाच्या घरात लावली पाहिजे आणि जो चुकत असेल त्याला ती पाठवली पाहिजे. ही कविता मंत्रालयात लावली होती. जागा चुकली होती.

स्थितीवर भाष्य करताना राज ठाकरे म्हणाले, आजचे वातावरण रोजच्या रोज गढूळ होत चालले आहे. भविष्यातील पुढच्या पिढीला आपण काय सांगणार आहोत. आपण कोणाला मतदान द्यावे, हे जनतेला कळले. साहित्यिक, कवी यांनी राजकीय वातावरणावर बोलायला हवे. कवींनी याबाबत बोलायला सुरूवात केली तर त्यांचेही महत्व वाढेल. सध्याच्या परिस्थितीवर भाष्य करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपले मराठी साहित्य दुसऱ्या भाषेत आले पाहिजे. आपली संस्कृती दुसऱ्या देशाला समजायला पाहिजे. राज ठाकरे यांनी यावेळी किशोरी आमोणकर यांच्या पुस्तक प्रकाशनाचा किस्साही सांगितला. राज ठाकरे म्हणाले, आमोणकरांच्या पुस्तकाचे प्रकाशनदेखील माझ्या हस्ते झाले होते. त्यावेळी मी आमोणकरांना म्हटले तुम्ही चुकीच्या माणसाला बोलावताय. विचार करा. राज ठाकरे यांच्या हस्ते किशोरी आमोणकरांच्या संगीत पुस्तकाचे प्रकाशन, या एका वाक्यातच किती विरोधाभास आहे.

# काँग्रेसचा विजय निश्चित : राहुल गांधी

## » राजस्थानात कांटे की टक्कर, पण सरकार बनवू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील विधानसभा निवडणुका काँग्रेस जिंकत असल्याचा दावा राहुल गांधींनी केला आहे. तेलंगाणाही जिंकू शकतो. राजस्थानमधील लढत जवळची असली तरी काँग्रेस जिंकेल, असा विश्वास त्यांना आहे. राहुल गांधी रविवारी दिल्लीत एका मीडिया हाऊसच्या कार्यक्रमात उपस्थित होते, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.**

जनतेच्या प्रश्नांवरून लक्ष वळवण्यासाठी भाजप अनेक डावपेचांचा अवलंब करत असल्याचा आरोप त्यांनी केला. रमेश बिधुरी यांनी संसदेत दुसऱ्या खासदाराला शिवीगाळ करून एक देश, एक निवडणूक ही कल्पना मांडली आहे. जेव्हा जेव्हा संसदेत कोणताही मुद्दा उपस्थित केला जातो तेव्हा ते लक्ष विचलित करण्यासाठी अशा गोष्टींचा वापर करतात, असेही राहुल म्हणाले. त्याचा सामना कसा करायचा हे आम्ही शिकलो आहोत. राहुल म्हणाले की भाजपने लक्ष वळवण्याचा प्रयत्न केला तरी कर्नाटक निवडणुकीतून एक महत्त्वाचा धडा काँग्रेसने घेतला आहे. ते आम्हाला आमचे नॅरेटिव्ह तयार करण्यापासून रोखत राहिले. त्याचप्रमाणे ते यापूर्वी अनेक निवडणुका जिंकत आले आहेत. यातून धडा घेत आम्ही आमच्या पक्षाचे नॅरेटिव्ह तयार करत कर्नाटकची निवडणूक लढवली. राहुल म्हणाले- आम्ही कर्नाटकातील लोकांना एक सरळ



दृष्टीकोन दिला की त्यांच्यासाठी अनेक सामाजिक सुरक्षा कार्यक्रम आहेत, ज्यांची अंमलबजावणी केली जात आहे. आणि अशाप्रकारे आम्ही नॅरे टिव्ह नियंत्रित करू शकलो. राहुल म्हणाले- तेलंगणात आम्ही कदाचित जिंकू शकतो, कारण तिथे भाजपचा पूर्णपणे नाश झाला आहे. मात्र मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये आम्ही नक्कीच जिंकू. राजस्थानमध्ये हे प्रकरण अगदी जवळचे आहे. तिथेही आम्ही जिंकू असे वाटते. भाजपही तेच सांगत आहे. उल्लेखनीय आहे की राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराममध्ये 2023 मध्येच विधानसभा निवडणुका होणार आहेत. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार आहे. मध्य प्रदेशात भाजप, तेलंगाणात भारत राष्ट्र समिती आणि मिझोराममध्ये मिझो नॅशनल फ्रंटचे सरकार आहे. राहुल गांधी म्हणाले की विरोधी इंडिया आघाडी गोष्टींशी जुळवून घेत आहे आणि एकत्र काम करत आहे. भारताची 60% लोकसंख्या विरोधी पक्षांसोबत आहे. 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीत आम्ही भारतीय जनता पक्षाला नक्कीच चकित करणार आहोत. राहुल यांनी दावा केला की त्यांचा पक्ष अशा परिस्थितीत घसरला आहे जिथे भाजप मीडिया नियंत्रित करते. भारतातील खरे मुद्दे गरिबी, बेरोजगारी, कनिष्ठ जाती, ओबीसी आणि आदिवासींवरील अन्याय आणि महागाई हे आहेत. भाजप त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नाही. म्हणूनच ते म्हणते- या बिधुरी जी निवेदन द्या. चला एकत्र येऊ आणि एकत्र निवडणुका घेऊ. भारताचे नाव बदलूया. हे सर्व लक्ष विचलित करणारे आहे. हे आम्ही जाणतो आणि समजतो. आणि आम्ही त्यांना तसे करू देणार नाही.

### भाजप स्पर्धा करू शकत नाही!

» लोकसभा आणि विधानसभांमध्ये 33% जागा राखीव ठेवल्या जातील एवढेच सांगितले जाते. आरक्षणाचा जनगणना किंवा परिसीमनाशी काहीही संबंध नाही. या विधेयकाचा लाभ महिलांना 10 वर्षांनंतर मिळेल, असे सरकार म्हणत आहे, पण काँग्रेसला आता ते हवे आहे. भाजपचे कम्युनिकेशन आर्किटेक्चरवर इतके नियंत्रण आहे की लोकांशी बोलणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य आहे. भाजपने कितीही ताकद लावली, प्रसारमाध्यमांनी कितीही विपर्यास करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा उपयोग झाला नाही. ही समस्या केवळ भारतातच नाही. याचा सामना जगभर केला जात आहे.

# मन की बातमध्ये चांद्रयानचा उल्लेख!

## » भारताची विश्वासार्हता वाढली : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मन की बातच्या 105 व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चांद्रयान-3 आणि G20 शिखर परिषदेच्या यशाबद्दल चर्चा केली. चांद्रयान यशस्वीतेसाठी मला अनेक पत्रे मिळाली, असे पंतप्रधान म्हणाले. या शिखर परिषदेत आफ्रिकेला पूर्ण सदस्य बनवून भारताने आपले नेतृत्व सिद्ध केले आहे.**

आजच्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी जर्मनीतील एका मुलीबाबतही चर्चा केली. ती पाहू शकत नाही, परंतु संस्कृत श्लोक इतक्या सहजपणे गाते, ते ऐकून प्रत्येकजण आश्चर्यचकित होतो. 27 सप्टेंबर रोजी होणाऱ्या जागतिक पर्यटन दिनाविषयी आणि शांती निकेतनवरही पंतप्रधानांनी या कार्यक्रमात चर्चा केली. चांद्रयान प्रक्षेपणाच्या दिवशी इस्रोने विक्रम केला पंतप्रधान म्हणाले- चांद्रयान लँडर उतरणार असताना मला अनेक पत्रे मिळाली. त्यानंतर अनेक लोक याचे साक्षीदार झाले. इस्रोचे यूट्यूब चॅनल 80 लाख लोकांनी पाहिले. हा एक विक्रम आहे. यावरून लोकांना किती आपुलकी आहे हे दिसून येते. यावेळी चांद्रयानवर प्रश्नमंजुषा सुरू आहे. ज्यामध्ये 15 लाखांहून अधिक लोक सहभागी होत आहेत. मी तुम्हाला यात सहभागी होण्यास सांगेन, अजून 6 दिवस बाकी आहेत. आफ्रिकेला G20 मध्ये सदस्य बनवून भारताने नेतृत्व सिद्ध केले पंतप्रधान म्हणाले- चांद्रयाननंतर G20 चे आयोजन चर्चेत आहे. या शिखर परिषदेत आफ्रिकेला पूर्ण सदस्य बनवून भारताने आपली क्षमता सिद्ध केली आहे. जेव्हा भारत खूप संपन्न होता तेव्हा सिल्क रूटची चर्चा होती. आता आणखी एक आर्थिक कॉरिडॉर सुचवला आहे. हा कॉरिडॉर पुढील शेकडो वर्षांसाठी जागतिक व्यापाराचा आधार ठरणार आहे. इतिहास हे लक्षात ठेवेल. शकुंतलाचे कुटुंब मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवत असे. पण सालच्या पानांवर भरतकाम करून त्यांनी नवीन कलाकुसर निर्माण केली. आता त्याचे कौशल्य महिलांना तसेच साल पाने गोळा करणाऱ्या अनेकांना रोजगार देत आहे. पंतप्रधान म्हणाले- G20 दरम्यान युवा शक्तीवर चर्चा करणे महत्त्वाचे आहे. वर्षभर कार्यक्रम झाले. दरम्यान, आणखी एक कार्यक्रम दिल्लीत होणार आहे. G20 युनिव्हर्सिटी कनेक्ट, ज्यामध्ये IIT, मेडिकल कॉलेज, IIM चे विद्यार्थी सामील होतील. 26 सप्टेंबर रोजी सामील व्हा. मी स्वतः यात सहभागी होणार आहे.



### तरुणांचे घोडा वाचनालय

» नैनिताल, उत्तराखंडमधील काही तरुण मुलांच्या शिक्षणासाठी काम करत आहेत. त्यांनी घोडा वाचनालय सुरू केले असून, त्याद्वारे दुर्गम भागात पुस्तके पोहोचवली आहेत. 12 गावांमध्ये पुस्तके पोहोचवण्याच्या कामात स्थानिक लोकही मदत करत आहेत. या आगळ्यावेगळ्या लायब्ररीला मुलांनाही पसंती मिळत आहे.

# प्रियंका चतुर्वेदींचे राज्यसभा सभापतींना पत्र

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना पत्र लिहून 21 सप्टेंबर रोजी संसदेच्या कामकाजादरम्यान महिला पाहुण्यांनी केलेल्या घोषणांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले की, राज्यसभेत महिला आरक्षण विधेयकावरील चर्चेदरम्यान खासदारांनी आमंत्रित केलेल्या काही महिलांनी राजकीय घोषणाबाजी केली होती. या पत्राबाबत माहिती देताना प्रियंका म्हणाल्या की, महिला पाहुण्या खासदारांच्या निमंत्रणावरून आल्या होत्या. संसदेच्या कामकाजादरम्यान कोणत्याही पाहुण्याला बोलण्याची परवानगी नसते. संसदेत एवढी सुरक्षा असतानाही काही महिलांनी घोषणा दिल्याचे मला वाईट वाटते. ही घटना नियम 264 चे उल्लंघन करणारी आहे. त्याअंतर्गत मी अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. राज्यसभेच्या कार्यपद्धती आणि कामकाजाच्या नियमांच्या नियम 264 मध्ये अभ्यागतांसाठी नियम दिले आहेत. या नियमानुसार, खासदार आपल्या ओळखीच्या कोणत्याही व्यक्तीसाठी व्हिजिटर कार्डसाठी अर्ज करू शकतो. काही विशेष प्रकरणांमध्ये, खासदार अशा लोकांसाठी व्हिजिटिंग कार्डसाठी अर्ज करू शकतात ज्यांची ओळख त्यांच्या ओळखीच्या एखाद्या व्यक्तीने केली आहे. दुस-या बाबतीत, खासदारांनी खूप सावध असले पाहिजे. ज्या लोकांना अभ्यागत कार्ड आणि त्यांच्या अर्जावर सभागृहात बसण्याची परवानगी देण्यात आली आहे, त्यांनी कोणतेही अनुचित कृत्य केले किंवा कोणताही अनुचित प्रकार घडवून आणला, तर त्यासाठी खासदारांना जबाबदार धरले जाईल, हे त्यांना सूचित करण्यात आले आहे पन्नासहून अधिक अभ्यागत सभागृहात घोषणाबाजी करू शकले, ही चिंतेची बाब आहे. या सुरक्षेतील त्रुटींच्या निषेधार्थ विरोधी पक्षांनी सभागृहातून सभात्याग केला. अशा स्थितीत या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

# गणपतीच्या 4 हातांची 4 रहस्ये!

**भगवान गणेशाला दोन हात असले तरी त्याच्या विशेष अवताराच्या वेळी त्याला चार हात असल्याचे वर्णन केले आहे. त्याच्या चार हातांच्या चार हातांमध्ये चार वस्तू आहेत. त्याच्या चार हातांपैकी एका हातात अंकुश, दुसऱ्या हातात फंदा, तिसऱ्या हातात मोदक आणि चौथ्या हातात आशीर्वाद आहे. त्याच्या चार हातांचे रहस्य काय आहे ते जाणून घेऊया.**



## 1. पहिला हात :

बाप्पाच्या पहिल्या हातातील अंकुश हे सूचित करतो, की इच्छांवर संयम ठेवणे आवश्यक आहे.

## 2. दुसरा हात :

गणेश बाप्पाच्या दुसऱ्या हातातील लूप हे या वस्तुस्थितीचे सूचक आहे की प्रत्येक व्यक्तीने आपल्या आचरणात आणि वर्तनात इतका संयम आणि नियंत्रण असणे आवश्यक आहे, जेणेकरून जीवनाचा समतोल राखला जाईल. फंदा हे नियंत्रण, संयम आणि शिक्षेचे प्रतीक आहे.

## 3. तिसरा हात :

त्याच्या तिसऱ्या हातामध्ये मोदक आहे. मोदकाचा अर्थ आनंद देणारा (सुख देणारा) जो सुख आणि समाधान देतो. शरीर आणि मन समाधानी असणे महत्वाचे आहे, तरच तुम्हाला जीवनात खरा आनंद मिळेल. समाधान कसे मिळते? किंबहुना, जसे थोडे-थोडे-थोडे मोदक खाल्ल्याने त्याची चव आणि गोडवा अधिक आनंद मिळतो आणि शेवटी मोदक खाल्ल्यावर समाधान वाटते, त्याचप्रमाणे वरवरचे आणि बाह्य ज्ञानाने माणसाला आनंद मिळत नाही. तर ज्ञान मिळते. आनंद आणि यशाचा गोडवा त्याच्या खोलात दडलेला आहे.

## 4. चौथा हात:

या हाताने तो भक्तांना आशीर्वाद देतो. जो आपल्या कर्माचे फळ भगवंताच्या हाती देतो त्याला परमेश्वर आशीर्वाद देतो. हा चौथ्या हाताचा संदेश आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती व्हावी!

भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे. आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे होणे आवश्यक आहे. अगदी काही दिवसांवर येउन ठेपलेला गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाची काळजी घेऊन आपल्याला गणेशोत्सव साजरा करता येईल. भारतीय संस्कृतीमध्ये सण, उत्सव व परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. देशभरात विविध भौगोलिक प्रदेशानुसार सर्वत्र सण, उत्सव व परंपरा साजरे केले जातात. भारतीय सण, उत्सव व परंपरेला पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही महत्व आहे. यामाध्यमातून पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे हा ही संदेश दिला जातो. सणांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण हा ही प्रमुख हेतू असतो. निसर्गाला किंवा पर्यावरणाला अनुसरूनच सर्व धर्मांचे सण, उत्सव व परंपरा आहेत. आजूबाजूच्या निसर्गसंपन्न वातावरणात सण साजरे केले जातात. सध्या गरज आहे सगळे सण हे निसर्गपूरक किंवा पर्यावरणपूरक कश्या पध्दतीने साजरे होतील हे पाहण्याची. त्यादृष्टीने जनजागृती होणे महत्वाचे आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला तर हा आनंद द्विगुणितच होईल. आनंददायी सोहळ्यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव कश्या पध्दतीने साजरा होईल हे पाहणे या निमित्ताने उचित ठरेल.आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा विचार करणे सुध्दा सध्या गरजेचे आहे. सध्या जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गचक्र बदलत आहे. मान्सून चक्र सुद्धा बदललेली आहे. महापूर, भूस्खलन यासारख्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येक सण हे पर्यावरणपूरक कशा पद्धतीने साजरा करता येईल हे पाहणे सध्याच्या काळामध्ये योग्य आहे. गणेशोत्सव साजरा करीत असताना जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेणे अपेक्षित आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा केला पाहिजे यावर प्रत्येकाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक बनलेले आहे. प्रत्येक सणानिमित्ताने घरामध्ये प्रसन्न वातावरण निर्माण होते. त्यामुळे व्यक्तीला, कुटुंबाला आणि समाजाला एक आत्मिक शांतता लाभते आणि आनंदही मिळतो. प्रसन्न वातावरणामुळे मनामध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे देशभरात साजरे करण्यात येणाऱ्या प्रत्येक सणाला विशेष महत्त्व आहे. सध्या संपूर्ण देशात गणेशोत्सवाचे मंगलमय वातावरण आहे. ढोल-ताशांच्या गजरामध्ये श्री गजाननाचे आगमन झालेले आहे. गौरीच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह, ऊर्जा, मराठी अस्मिता व परंपरा आणी भारतीय संस्कृतीचे प्रतीक असा सण आहे. सण साजरे करताना उत्सवातून प्रदूषण होणार नाही याची खबरदारी प्रत्येकाने घ्यायला हवी. सध्या सर्वत्र पर्यावरण ऱ्हासमुळे विविध प्रकारच्या समस्यांचा डोंगर उभा आहे. हवा, पाणी, ध्वनी आणि जमिनीचे प्रदूषण वाढतच आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणामध्ये आणखी भर नको. म्हणून इथून पुढच्या काळामध्ये प्रत्येक सण, उत्सव व परंपरा साजरे करताना पर्यावरण रक्षणांचा विचार करायला हवा. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण काय करू शकतो व आपण स्वतः पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी काय मदत करू शकतो. हेही प्रत्येकाने पाहिले पाहिजे. ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण कमी करण्यास हातभार लावू शकतो. गणेशोत्सव काळामध्ये मोठ्या प्रमाणात स्पीकर लावले जातात त्यामुळे ध्वनी प्रदूषण होते. त्यामुळे कमी आवाजात स्पिकर लावणे गरजेचे आहे. आतषबाजीमुळे फटाक्यातून हवा प्रदूषण होते. त्यामुळे फटाकेमुक्त गणेशोत्सव साजरा करणे गरजेचे आहे. गणपतीचे विसर्जन करताना नदीमध्ये किंवा तलावांमध्ये न करता मूर्तीदान करून पर्यावरण रक्षणासाठी मदत करू शकतो. गणेशोत्सवासाठी जंगलातील विविध प्रकारची पाने, फुले, फळे व वनस्पती यांचा वापर पूजा व सजावट करण्यासाठी केला जातो. त्यामुळे निसर्गातील दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून गणेशोत्सवात शेतामध्ये किंवा परस बागेमध्ये पिकवल्या जाणाऱ्या बागयती फुलांचा व फळांचा वापर करुन पर्यावरणपूरक सण साजरा करण्यास हातभार लावणे गरजेचे आहे.



# भारतीय हॉकी संघाची ऐतिहासिक कामगिरी!

## » उझबेकिस्तानवर 16-0ने मिळवला दणदणीत विजय

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशियाई खेळ २०२३चे आयोजन चीनमध्ये होत आहे. जिथे भारतातील अनेक खेळाडू सहभागी झाले आहेत. भारताने स्पर्धेच्या पहिल्या दिवशी अप्रतिम कामगिरी करत पदकाचे खातेही उघडले आहे. याशिवाय भारतीय संघाने हॉकीमध्ये दमदार सुरुवात केली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारत आणि उझबेकिस्तान यांच्यात हॉकी सामना झाला. या सामन्यात टीम इंडियाने दणदणीत विजय नोंदवला आहे. भारताच्या फॉरवर्ड खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या सामन्यात टीम इंडियाने उझबेकिस्तानचा १६-० अशा मोठ्या फरकाने पराभव केला.**

भारतीय पुरुष हॉकी संघाने आशियाई क्रीडा २०२३मध्ये शानदार सुरुवात केली आहे. 'अ' गटातील पहिल्या सामन्यात उझबेकिस्तानचा १६-० असा दारूण पराभव केला. चीनच्या हांगझाऊ प्रांतात सुरू असलेल्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील या सामन्यात रविवारी उझबेकिस्तानने भारतीय हॉकी संघासमोर सपशेल शरणागती पत्करली. गोंगझू कॅनाल स्पोर्ट्स पार्क स्टेडियमवर टीम इंडियाने उझबेकिस्तानला धोबीपछाड देत ग्रुपमध्ये पहिले स्थान पटकावले. उझबेकिस्तानविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात टीम इंडियाने ८ गोल हे वेगवेगळ्या खेळाडूंनी केले. त्यापैकी तीन खेळाडूंनी भारतासाठी हॅट्रिक गोल केले. भारताकडून ललित उपाध्याय (७', २४', ३७', ५३'), वरुण कुमार (१२', ३६', ५०', ५२'), अभिषेक (१७'), मनदीप सिंग (१८', २७', 28) ') अमित रोहिदास (38□), सुखजीत (४२'), शमशेर सिंग (४३') आणि संजय (५७') यांनी गोल केले. या विजयासह



तीन वेळा आशियाई क्रीडा स्पर्धेत विजेतेपद पटकावलेल्या भारताने पुरुष हॉकी पूल अ मध्ये पहिल्या स्थानावर मजल मारली आहे. प्रत्येक पूलमधून दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशन (FIH) क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेला भारतीय पुरुष हॉकी संघ गेल्या महिन्यात आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावल्यानंतर हांगझाऊ एशियन गेम्समध्ये आला होता. कर्णधार हरमनप्रीत सिंगशिवाय सुरुवात करूनही भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक वृत्ती स्वीकारली आणि जागतिक क्रमवारीत ६६व्या क्रमांकावर असलेल्या उझबेकिस्तानचा पराभव केला. सामन्याच्या सात मिनिटांनंतर ललित उपाध्यायने पेनल्टी कॉर्नरवर उझबेकिस्तानच्या गोलरक्षकाला हरवून भारताची धावसंख्या १-० अशी केली. काही मिनिटांनी वरुण कुमारने दुसऱ्या पेनल्टी कॉर्नरवरून भारताची आघाडी दुप्पट केली. पहिल्या क्वार्टरचा स्कोअरबोर्ड २-० असा भारताच्या बाजूने झाला. भारताने दुसऱ्या क्वार्टरमध्येही आपले वर्चस्व कायम ठेवले आणि अभिषेक आणि मनदीप सिंगच्या माध्यमातून दोन झटपट मैदानी गोल केले. ललित उपाध्यायने त्याचा दुसरा आणि संघाचा पाचवा गोल जवळून अगदी सहज केला. त्यानंतर मनदीप सिंगनेच दोन मिनिटांत दोन गोल करत हॅट्रिक पूर्ण केली आणि हाफ टाइमला भारताने ७-० अशी भक्कम आघाडी घेतली होती. ब्रेकनंतर भारताने आणखी ९ गोल केले आणि सामना १६-० असा जिंकला. भारतीय पुरुष हॉकी संघाचा पुढील सामना मंगळवारी सिंगापूरशी होणार आहे. आशियाई खेळ २०२३ मधील पुरुषांची हॉकी स्पर्धा ही देखील ऑलिम्पिक पात्रतेसाठी महत्वाची आहे, ज्यामध्ये सुवर्ण विजेता संघ पॅरिस २०२४ साठी पात्र ठरेल.

### 'या' खेळाडूंनी गोल केले

» उझबेकिस्तानविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात टीम इंडियाने ८ गोल हे वेगवेगळ्या खेळाडूंनी केले. त्यापैकी तीन खेळाडूंनी भारतासाठी हॅट्रिक गोल केले. भारताकडून ललित उपाध्याय (७', २४', ३७', ५३'), वरुण कुमार (१२', ३६', ५०', ५२'), अभिषेक (१७'), मनदीप सिंग (१८', २७', 28) ') अमित रोहिदास (38□), सुखजीत (४२'), शमशेर सिंग (४३') आणि संजय (५७') यांनी गोल केले. या विजयासह तीन वेळा आशियाई क्रीडा स्पर्धेत विजेतेपद पटकावलेल्या भारताने पुरुष हॉकी पूल अ मध्ये पहिल्या स्थानावर मजल मारली आहे. प्रत्येक पूलमधून दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

# गिलने आमलाचा विक्रम मोडला!

## » वनडेतील सहावे शतक झळकावले

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत शुबमन गिल शानदार फॉर्ममध्ये दिसत आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात शुबमन गिलला ७४ धावांवर ॲडम झम्पाने क्लीन बोल्ड केले होते. मात्र, दुसऱ्या सामन्यात त्याने दमदार फटकेबाजी करत शतकाचे लक्ष्य पूर्ण केलो. त्याच्या एकदिवसीय क्रिकेट कारकिर्दीत प्रथमच, गिलने कांगारू संघाविरुद्ध शतक झळकावण्यात यश मिळविले, तर त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील हे सहावे शतक होते. तसेच या खेळीच्या जोरावर हाशिम आमलाचा विक्रम मोडला.**

शुबमन गिलने कांगारू संघाविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ३७ चेंडूत षटकार ठोकून आपले अर्धशतक पूर्ण केले होते आणि या सामन्यातही त्याने ३७ चेंडूत षटकार ठोकून आपले शतक पूर्ण केले. यानंतर त्याने आपली उत्कृष्ट फलंदाजी कायम ठेवत ९२ चेंडूत शतक पूर्ण केले. आपल्या शतकी खेळीत त्याने ४ षटकार आणि ६ चौकार लगावले. या सामन्यात गिलने ९७ चेंडूत १०४ धावांची खेळी केली. शुबमन गिलने त्याच्या शतकादरम्यान एकदिवसीय क्रिकेटमध्ये इतिहास रचला. तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३५ डावांनंतर सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पहिला ठरला. त्याने हाशिम आमलाला मागे सोडले, ज्याने वनडेच्या पहिल्या ३५ डावात १८४४ धावा केल्या होत्या.

### 2023 मध्ये झळकावले सातवे शतक

» शुबमन गिलने वर्ष २०२३ मध्ये त्याचे सातवे शतक झळकावले. तो एका वर्षात ५ किंवा त्याहून अधिक शतके झळकावण्यात यशस्वी ठरत, त्याने त्याच्या क्रिकेट कारकीर्दीत प्रथमच हे केले. यापूर्वी विराट कोहली, रोहित शर्मा, सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, सौरव गांगुली आणि शिखर धवन यांनी भारतासाठी एका वर्षात पाच किंवा त्याहून अधिक शतके झळकावली आहेत.



# भारतीय महिला क्रिकेट टीम एशियाडच्या अंतिम फेरीत!

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

भारतीय महिला संघाने 19व्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेटच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. रविवारी झालेल्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात टीम इंडियाने बांगलादेशचा 8 गडी राखून पराभव केला. या विजयामुळे भारताचे क्रिकेटमधील पदक निश्चित झाले आहे. सुवर्णपदक सामना : भारतीय संघ सोमवारी दुसऱ्या उपांत्य फेरीतील विजेत्याशी सामना करेल. या मैदानावर आज दुसरा उपांत्य सामना पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यात होणार आहे. चीनमधील हांगझोऊ शहरात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश संघाने नाणेफेक जिंकून सर्वबाद 51 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने 8.2 षटकांत दोन गडी राखून लक्ष्य गाठले. वेगवान गोलंदाज पूजा वस्त्राकरने चार षटकांत 17 धावा देत चार बळी घेतले. पूजाने एस राणी, शमिमा सुलताना, एस मोस्तारी आणि रितू मेनी यांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. पूजाच्या गोलंदाजीमुळे भारतीय गोलंदाजांनी बांगलादेशला 51 धावांवर रोखले. 52 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाला कर्णधार स्मृती मानधना (7 धावा) आणि शेफाली वर्मा (20 धावा) यांनी शानदार सुरुवात करून दिली. दोघांनी 19 धावा जोडल्या. उर्वरित जेमिमाह रॉड्रिग्जने 20 धावांची खेळी केली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला बांगलादेशचा संघ भारताविरुद्ध महिला टी-२० च्या इतिहासातील सर्वात कमी धावसंख्येवर बाद झाला. संघ 17.5 षटकांत 51 धावांत सर्वबाद झाला. कर्णधार निगार सुलताना (12 धावा) शिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला दुहेरी आकडाही गाठता आला नाही. पहिली: शथी राणी - 0 धावा : पहिल्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर पूजा वस्त्राकरने यष्टिरक्षक रिचा घोषकडे झेलबाद केले आणि तिची सलामीवीर राणीला पॅव्हेलियनमध्ये पाठवले.